■ RNI NO. MAHMAR/25/A3029

■ लातूर

■ वर्ष : ७ वे, अंक नं. : ५८

■ दि. २१ जून २०२६, वार : रविवार

■ पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


# प्रत्येक बुद्ध विहारात वाचनालय, अभ्यासिका व संस्कार केंद्र उभे राहिले पाहिजे : विनोदभाऊ खटके

## वाढदिवसानिमित्त मिलिंद नगर येथील माता रमाई बुद्ध विहारात बुद्धमूर्ती प्रतिष्ठापना









**लातूर/प्रतिनिधी :** व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या वाढदिवसानिमित्त मिलिंद नगर येथील माता रमाई बुद्ध विहारात भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना उत्साहात व धार्मिक वातावरणात संपन्न झाली. विनोदभाऊ खटके यांनी वाढदिवसानिमित्त बुद्धमूर्ती भेट दिल्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

बुद्धमूर्ती प्रतिष्ठापनेचा विधिवत कार्यक्रम भन्ते पय्यानंद थेरो यांच्या हस्ते पार पडला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना विनोदभाऊ खटके म्हणाले की, "विहार तिथे बुद्धमूर्ती" ही संकल्पना संघटनेच्या माध्यमातून राबविण्याचा आमचा प्रयत्न आहे. प्रत्येक बुद्ध विहारात वाचनालय, अभ्यासिका आणि संस्कार केंद्र उभे राहिले पाहिजे. बुद्ध विहारे ही केवळ प्रार्थना व उपासनेची केंद्रे न राहता समाजप्रबोधन, शिक्षण आणि युवकांना दिशा देणारी केंद्रे बनली पाहिजेत. त्यातून समाजात वैचारिक परिवर्तन घडेल आणि प्रबोधनाची चळवळ अधिक बळकट होईल.

कार्यक्रमात भन्ते पय्यानंद थेरो यांनी 'चलो बुद्ध विहार' या उपक्रमाची माहिती देत लातूर शहरातील विविध बुद्ध विहारांमध्ये जनजागृती करण्यात येत असल्याचे सांगितले. त्याच जनजागृती मोहिमेचा भाग म्हणून मिलिंद नगर येथील माता रमाई बुद्ध विहारात नियमित बुद्धवंदना आणि सामाजिक उपक्रम सुरू झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

भन्ते पय्यानंद थेरो यांनी सांगितले की, काही वर्षांपूर्वी या परिसरात नियमित बुद्धवंदना होत नव्हती. मात्र माता रमाई महिला मंडळाच्या पुढाकारामुळे आज दर रविवारी महिला पांढऱ्या साड्या परिधान करून बुद्धवंदना, त्रिशरण-पंचशील ग्रहण तसेच खीर वाटपाचा उपक्रम नियमितपणे राबवत आहेत. याशिवाय महापुरुषांच्या जयंती व स्मृतिदिनानिमित्त विविध सामाजिक आणि प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात येत आहे.

यावेळी भालचंद्र सोनकांबळे, लातूर महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते देविदास काळे, माजी नगरसेवक रघुनाथ बनसोडे, मुख्याध्यापक अच्युतराव सोनवणे, मुस्लिम क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष हमीदखान पठाण, डॉ. शेख इमरान, नगरसेवक ॲड. मनोज थोरात तसेच विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सर्जरी विभागाचे प्रमुख डॉ. मेघराज चावडा यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी बुद्धांच्या करुणा, समता, बंधुता आणि मानवतेच्या विचारांचा समाजात प्रसार होण्याची गरज व्यक्त केली.

माता रमाई महिला मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमास बब्रुवान मिस्त्री बनसोडे, दिलीप गायकवाड, श्यामसुंदर भुतकर, प्रणव सुरवसे, सुनील बनसोडे, प्रकाश बनसोडे, पवन कांबळे, कमलाकर हिंगे, भानुदास शृंगारे, प्रमोद जोगदंड यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

तसेच माता रमाई महिला मंडळाच्या रमा अशोक हनवते, सीमा जोगदंड, मनीषा शृंगारे, कोमलबाई कांबळे, बेबीनंदा बनसोडे, जयश्री गायकवाड, कल्पना कांबळे, माया उजगीरे, हुक्काबाई भुतकर, शारदा भुतकर, सुजाता कांबळे, अरुणा भुतकर, कविता जोगदंड, कविता बनसोडे, मीनाक्षी बनसोडे, प्रभावती बनसोडे आदी उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन येणेगुरे हायस्कूलचे मुख्याध्यापक शिवाजी कराड यांनी केले, तर आभार प्रदर्शन अशोक हानवते यांनी केले.

बुद्धमूर्ती प्रतिष्ठापना कार्यक्रमानंतर माता रमाई महिला मंडळाच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवर, उपासक-उपासिका आणि नागरिकांना खीर वाटप करण्यात आले. महिला मंडळाच्या सदस्यांनी उत्साहाने हा उपक्रम राबविला. भगवान बुद्धांच्या करुणा, मैत्री आणि समतेच्या संदेशाचे स्मरण करत सर्वांनी खीर प्रसादाचा लाभ घेतला.

विनोदभाऊ खटके यांनी वाढदिवसानिमित्त बुद्धमूर्ती भेट देऊन सामाजिक, शैक्षणिक आणि वैचारिक प्रबोधनाचा संदेश देण्यात आल्याने उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत केले. समाजात बुद्ध, फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार व्हावा तसेच बुद्ध विहारे ही समाजपरिवर्तनाची केंद्रे बनावीत, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात नीट परीक्षेसाठी पोलिस प्रशासनाची जय्यत तयारी



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२१ जून २०२६ रोजी होणाऱ्या नीट परीक्षेसाठी पोलिस प्रशासनाने जय्यत तयारी केलेली आहे. या तयारी संदर्भात जिल्हा पोलिस प्रशासन व सीआरपीएफ यांचा समावेश आहे.या तयारीसाठी पोलिस प्रशासनातर्फे पोलिस अधीक्षक अमोल तांबे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण,डीवायएसपी समिरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस इन्स्पेक्टर समाधान चवरे, पोलिस उपनिरीक्षक किशोर हांगे तसेच पोलिस अंमलदार साखरे ,अविनाश शिंदे काम पाहत आहेत.यांच्यासोबत पीएसआय वाघमारे, सीआरपीएफ जवान शर्मा तसेच एस.एन.उदारे,एस.जी.कांबळे,एस.पी.सूर्यवंशी उपस्थित आहेत.या नीट परीक्षेसाठी महाविद्यालयातर्फे महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर, प्रा. विजयकुमार मांदळे हे काम पाहत आहेत.या परीक्षेसाठी चोक बंदोबस्त करण्यात आलेला आहे.

## अनुसूचित जाती उपवर्गीकरणाविरोधात रविवारी लातूरमध्ये महत्वपूर्ण बैठक

**लातूर/प्रतिनिधी :** अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने अनुसूचित जाती समाजाच्या संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी रविवारी, दि. २१ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर येथे महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावामुळे समाजात फूट पडण्याची शक्यता निर्माण झाली असून या विषयावर समाजाची एकसंघ भूमिका निश्चित करण्याच्या उद्देशाने या बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या बैठकीत अनुसूचित जाती उपवर्गीकरणाचे सामाजिक व घटनात्मक परिणाम, समाजाची एकजूट कायम ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना, जनजागृती आणि संघटनात्मक बांधणी यासह पुढील आंदोलनाचा आराखडा यावर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. तसेच अनुसूचित जाती उपवर्गीकरणाच्या विरोधातील पुढील आंदोलनाची दिशा निश्चित करण्याबाबतही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

अनुसूचित जाती समाजाच्या संविधानिक हक्कांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि समाजाची एकजूट अधिक मजबूत करण्यासाठी ही बैठक महत्त्वाची ठरणार असल्याचे कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले आहे. तरी अनुसूचित जातीतील सर्व समाजघटक, युवक, महिला, विद्यार्थी, कर्मचारी, अधिकारी, विधीज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी आणि समाजबांधव यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या अभ्यासपूर्ण सूचना व भूमिका मांडाव्यात, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

"एकच ध्येय अनुसूचित जाती समाजाची एकता आणि संविधानिक हक्कांचे संरक्षण" या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अनुसूचित जातीतील सर्व समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

## गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतूक, शहर पोलिसांकडून तिघांवर हद्दपारीची कारवाई

**नाशिक/प्रतिनिधी :** गोवंश जातीच्या जनावरांची बेकायदेशीर वाहतूक, कत्तल आणि मांसविक्रीसारखे गंभीर गुन्हे करणाऱ्या तीन सराईत गुन्हेगारांवर नाशिक शहर पोलिसांनी हद्दपारीची कारवाई केली आहे. सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांविरोधात कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

पोलीस उपायुक्त किशोर काळे यांनी रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा आढावा घेऊन संबंधित विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. गुन्हेगारांविरुद्ध दाखल गुन्हे, त्यांचे वास्तव्य, हालचाली व वर्तन यांची तपासणी करून प्रतिबंधात्मक कारवाईचे प्रस्ताव तयार करण्यात आले. यानुसार नवाज रशीद सय्यद उर्फ मुन्ना (वय ५२, रा. बागवानपुरा, नाशिक रोड), जमील रशीद कुरेशी (वय ४०, रा. नाईकवाडीपुरा, जुने नाशिक) आणि अंजुम बिस्मिल्ला कुरेशी (वय ५०, रा. मुंबई नाका, नाशिक) या तिघांवर कारवाई करण्यात आली.

# मुंबई-लातूर-बिदर एक्सप्रेसला तीन अतिरिक्त डबे मंजूर : खा. डॉ. काळगे

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर - मुंबई - बिदर एक्सप्रेस रेल्वेला अतिरिक्त तीन डबे मंजूर करण्याच्या मागणीला यश आल्याची माहिती लातूरचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी दिली. रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने लावून धरलेल्या मागणीची पूर्तता झाल्याने काही प्रमाणात प्रवाशांना दिलासा मिळणार असल्याचेही खा. डॉ. काळगे यांनी सांगितले.



यासंदर्भात बोलताना खा. डॉ. शिवाजीराव काळगे म्हणाले की, मुंबई -लातूर - बिदर या गाडीला अतिरिक्त डबे मिळावेत, ही मागणी मी माझ्या राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीपासून सातत्याने मांडत आलो आहे. खासदार म्हणून निवडून आल्यापासून केंद्रीय रेल्वे प्रशासनाकडे या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला.

बिदर स्थानकावरील प्लॅटफॉर्मची लांबी अपुरी असल्यामुळे दक्षिण मध्य रेल्वेकडून हा विषय काही काळ प्रलंबित होता. नुकत्याच सिकंदराबाद विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्या दौऱ्यादरम्यान या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून आता गाडीच्या रचनेत वाढ झाली आहे.

त्यानुसार, गाडी क्रमांक २२१०७ / २२१०८ व २२१४३ / २२१४४ मुंबई-लातूर - बिदर सुपरफास्ट एक्सप्रेसमध्ये दि. २५ जून २०२६ पासून ३ अतिरिक्त डबे जोडण्यात येणार आहेत. यामध्ये एक वातानुकुलित द्वितीयश्रेणी ( AC 2 Tier ) प्रवासी क्षमता ४६ असेल, एक वातानुकुलित तृतीय श्रेणी ( AC 3 Tier ) ज्याची प्रवासी क्षमता ६४ असेल व एक शयनयान श्रेणी ( Sleeper Class) ज्याची प्रवासी क्षमता ७२ असेल. यामुळे या गाडीची रचना २१ डब्यांवरून २४ डब्यांची होणार असून अधिक प्रवाशांना आरक्षणाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

या निर्णयाबद्दल आपण केंद्रीय रेल्वे प्रशासन, विशेषतः मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक तसेच दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो,असे खा. डॉ. काळगे यांनी बोलून दाखविले. मात्र, हा पाठपुराव्याचा पहिला टप्पा आहे. लातूर बिदर मार्गावरील प्रवाशांना अधिक सुरक्षित, अधिक आरामदायी आणि आधुनिक प्रवासाची सुविधा मिळावी, यासाठी या गाडीला जुन्या आयसीएफ डब्यांऐवजी अत्याधुनिक व अधिक सुरक्षित एलएचबी डबे उपलब्ध व्हावेत, ही आपली प्रमुख मागणी असून त्यासाठीचा पाठपुरावा यापुढेही पूर्वीप्रमाणेच सातत्याने सुरू राहणार आहे. जनतेच्या हितासाठी आणि लातूर लोकसभा मतदारसंघातील रेल्वे सुविधांच्या विकासासाठी माझे प्रयत्न अविरत सुरूच राहतील,अशी ग्वाहीही खा. डॉ. काळगे यांनी दिली आहे.

## भिवंडीत शोरमा-पिझ्झानंतर ८० जणांना उलट्या-जुलाब; तुकाराम मुंढेंच्या एफडीएने घेतले नमुने, पालिकेचा बुलडोझर

**ठाणे/प्रतिनिधी :** अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकराम मुंढे यांच्या पथकाकडून राज्यभरात भेसळयुक्त अन्न पदार्थ, प्रतिबंधित गुटखा, पान मसालाविरोधात कारवाई सुरू असतानाच, भिवंडी येथील खंडूपाडा परिसरातील एका शोरमा दुकानातील खाद्यपदार्थ खाल्ल्यानंतर तब्बल ८० जणांना विषबाधा झाल्याचा प्रकार शुक्रवारी उघडकीस आला. या प्रकरणी शांतीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे तर, महापालिकेने संबंधित दुकानावर बुलडोझर चालवत कारवाई केली असून, अन्न व रुग्णांच्या उलटीचे नमुने घेऊन अन्न व औषध प्रशासनाने तपास सुरू केला आहे.

भिवंडीतील खंडूपाडा परिसरात "फेमस शोरमा" नावाचे दुकान आहे. या दुकानात गुरूवारी आसिफ अमीन सय्यद आणि त्यांचा मित्र शहाबाज अन्सारी यांनी शोरमा आणि पिझ्झा खाल्ला. त्यानंतर त्यांनी शोरमा आणि पिझ्झा पार्सल घेऊन तो घरी नेला. त्यांच्या कुटूंबियांनीही तो खाल्ला. यानंतर त्यांना उलट्या, जुलाब आणि पोटदुखीचा त्रास झाला. प्राथमिक उपचारानंतरही प्रकृतीत सुधारणा होत नव्हती. यामुळे संबंधितांना शुक्रवारी भिवंडीतील आयजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी अन्नातून विषबाधा झाल्याचे स्पष्ट केल्याने आसिफ यांनी शांतीनगर पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

सुरूवातीला विषबाधा झालेल्यांचा आकडा ७ ते ८ इतका होता. मात्र, शुक्रवार सकाळपासून त्यात वाढ होऊ लागली आणि सायंकाळी उशीरापर्यंत तो ८० वर पोहचला. या प्रकरणात आतापर्यंत सुमारे ८० जणांना विषबाधा झाल्याचे समोर आले असून त्यापैकी १२ जणांना उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहे.

## जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या वाढदिवसानिमित्त
# पर्यावरण संरक्षणाचा संदेश, प्लास्टिकमुक्त लातूरसाठी जनजागृती अभियान

**लातूर/प्रतिनिधी :** वाढदिवस हा केवळ उत्सवाचा नव्हे तर समाजहिताचा संदेश देण्याचाही प्रसंग ठरू शकतो, याचा आदर्श लातूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या वाढदिवसानिमित्त पाहायला मिळाला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्त लातूर आणि कापडी पिशवी वापर जनजागृती अभियान उत्साहात राबविण्यात आले. यावेळी पर्यावरण रक्षणासोबतच नागरिकांच्या आरोग्यपूर्ण आणि जबाबदार जीवनशैलीवरही भर देण्यात आला.



कार्यक्रमात वाढदिवस, लग्नसमारंभ तसेच विविध आनंदाच्या प्रसंगी फटाके, हार-तुरे आणि अनावश्यक खर्च टाळून वृक्षारोपण करण्याचा संदेश देण्यात आला. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात छोटे पण प्रभावी बदल स्वीकारण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तसेच, प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णतः बंद करून कापडी पिशवीचा स्वीकार करण्याचे आवाहन करण्यात आले.

विशेष म्हणजे सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांच्या "आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी" या अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या मोफत कापडी पिशवी वाटप उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले. पर्यावरण संरक्षणासोबतच नागरिकांमध्ये आरोग्य, स्वच्छता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.बाजारात जाताना प्रत्येक नागरिकाने स्वतःसोबत कापडी पिशवी नेण्याचा संकल्प करावा, प्लास्टिकमुक्त लातूर उभारण्यासाठी सामूहिक सहभाग वाढवावा आणि पर्यावरण संवर्धनाला लोकचळवळीचे स्वरूप द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

"एक व्यक्ती पाच झाडे", "प्लास्टिकला नकार कापडी पिशवीचा स्वीकार" आणि "पर्यावरण संरक्षण प्रत्येकाची जबाबदारी" हा संदेश देत जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण रक्षणाचा संकल्प करण्याचे आवाहन करण्यात आले.

या प्रसंगी नायब तहसीलदार श्री. सुधीर हणमंतराव देशमुख, नायब तहसीलदार श्री. गणेश सरवदे, लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीचे अध्यक्ष श्री. नागनाथ गित्ते, उद्योजक श्री. अनिल झवर तसेच समाजसेवक संजय राजुळे आदी उपस्थित होते.

## संपादकीय...

### लोकसंख्या ही ओझे की शक्ती, हे शेवटी त्या समाजाच्या विकासाच्या पातळीवर अवलंबून

मध्य प्रदेशचा दोन मुलांच्या अटीचा निर्णय रद्द करण्याचा निर्णय भारतातील बदलत्या लोकसंख्या वास्तवाचा आणि भविष्यातील मनुष्यबळाच्या गरजांचा महत्त्वपूर्ण संकेत मानला जात आहे. लोकसंख्येचा प्रश्न हा कोणत्याही देशासाठी केवळ आकड्यांचा विषय नसतो; तो अर्थव्यवस्था, रोजगार, सामाजिक विकास आणि भविष्यातील मानवी संसाधनांशी थेट जोडलेला असतो. त्यामुळेच काळानुसार लोकसंख्येबाबतच्या सरकारी धोरणांमध्ये बदल होत असतात. मध्य प्रदेश सरकारने अलीकडेच दोनपेक्षा अधिक मुले असलेल्या नागरिकांनाही सरकारी नोकरीसाठी पात्र ठरवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे जवळपास २५ वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या दोन मुलांच्या अटीचा शेवट झाला आहे. हा निर्णय केवळ एका राज्यापुरता मर्यादित नसून भारतातील बदलत्या लोकसंख्या वास्तवाचे प्रतिबिंब मानावे लागेल. २००१ मध्ये मध्य प्रदेशात दोनपेक्षा जास्त जिवंत अपत्ये असलेल्या उमेदवारांना सरकारी सेवेत थेट भरती किंवा पदोन्नतीसाठी अपात्र ठरवण्याचा नियम लागू करण्यात आला होता. त्या काळात राज्यातील एकूण प्रजनन दर ३.९ इतका होता. म्हणजे एका महिलेपासून सरासरी जवळपास ४ मुले जन्माला येत होती. वाढत्या लोकसंख्येमुळे विकासावरील ताण, मर्यादित संसाधनांवरील दबाव आणि रोजगाराच्या संधींवरील स्पर्धा यांचा विचार करून अशा कठोर उपाययोजना करण्यात आल्या होत्या. 'हम दो, हमारे दो' ही संकल्पना त्या काळातील लोकसंख्या धोरणाचा केंद्रबिंदू बनली होती. मात्र, गेल्या दोन दशकांत परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलली आहे. शिक्षणाचा प्रसार, शहरीकरण, महिलांचे वाढते सक्षमीकरण, आरोग्यसेवांमधील सुधारणा आणि कुटुंब नियोजनाच्या व्यापक मोहिमांमुळे भारतातील प्रजनन दर सातत्याने घसरला आहे. मध्य प्रदेशात तो आता २.० वर आला आहे. लोकसंख्याशास्त्राच्या दृष्टीने २.१ हा 'प्रतिस्थापन प्रजनन दर' मानला जातो. या पातळीखाली प्रजनन दर गेल्यास दीर्घकालीन कालावधीत लोकसंख्या स्थिर राहण्याऐवजी घटू लागते. त्यामुळे पूर्वी लोकसंख्यावाढीची चिंता असलेल्या सरकारांना आता भविष्यातील कार्यक्षम मनुष्यबळाची चिंता वाटू लागली आहे. ही चिंता केवळ मध्य प्रदेशापुरती मर्यादित नाही. आंध्र प्रदेशनेही अलीकडच्या काळात लोकसंख्यावाढीस प्रोत्साहन देणारे संकेत दिले आहेत. तेथील प्रजनन दर १.५ पर्यंत खाली आला आहे. परिणामी, भविष्यात कामगारांची संख्या कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वृद्ध लोकसंख्या वाढत असताना, तरुण कार्यबल कमी होणे हे आर्थिक विकासासाठी गंभीर आव्हान ठरू शकते. म्हणूनच तेथील सरकारने अधिक मुले असलेल्या कुटुंबांना प्रोत्साहन देण्याचा विचार पुढे आणला आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारतानेही आता या बदलत्या वास्तवाकडे गांभीर्याने पाहण्यास सुरुवात केली आहे. एकेकाळी लोकसंख्या नियंत्रणाच्या आक्रमक धोरणांसाठी ओळखला जाणारा चीन याचे सर्वात महत्त्वाचे उदाहरण आहे. १९८० मध्ये लागू करण्यात आलेल्या 'एक मूल धोरणा'मुळे चीनची लोकसंख्यावाढ आटोक्यात आली; परंतु त्याचबरोबर जन्म दर झपाट्याने घसरला. परिणामी, वृद्धत्वाकडे झुकणारी लोकसंख्या आणि घटणारे कार्यबल ही नवी संकटे निर्माण झाली. त्यामुळे चीनला २०१६ मध्ये दोन मुले आणि २०२१ मध्ये तीन मुले धोरण स्वीकारावे लागले. भारततही आज परिस्थिती वेगाने बदलत आहे. देशाचा एकूण प्रजनन दर १.९ वर आला आहे. अवघ्या २५ वर्षांपूर्वी तो ३.३ होता. बिहारमध्ये २.९, उत्तर प्रदेशात २.४ आणि झारखंडमध्ये २.३ असा दर असला, तरी बहुतेक राज्यांनी प्रतिस्थापन पातळी गाठली किंवा ओलांडली आहे. यामुळे लोकसंख्यावाढीचा वेग पूर्वीच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात मंदावला आहे. अर्थात, याचा अर्थ कुटुंब नियोजनाचे महत्त्व संपले, असा होत नाही. लोकसंख्येचे अनियंत्रित वाढणे जितके धोकादायक असते, तितकीच वेगाने घटणारी लोकसंख्याही चिंतेची बाब असते. कोणत्याही राष्ट्राला आवश्यक असते ती संतुलित लोकसंख्या रचना. पुरेसे तरुण कार्यबल, वाढती उत्पादकता आणि वृद्ध लोकसंख्येचा योग्य सांभाळ, यांचा समतोल साधणे हेच खरे आव्हान आहे. भारतातील लोकसंख्या धोरण आता नियंत्रणापेक्षा व्यवस्थापनाकडे वळत आहे. मात्र, कोणत्याही धोरणाचे अंतिम उद्दिष्ट लोकसंख्येची संख्या नसून त्या लोकांचे जीवनमान असले पाहिजे. अधिक शिक्षण, चांगल्या आरोग्य सुविधा, रोजगाराच्या संधी आणि आर्थिक समृद्धी उपलब्ध करून देण्यातच देशाच्या भविष्याची खरी गुरुकिल्ली दडलेली आहे. लोकसंख्या ही ओझे की शक्ती, हे शेवटी त्या समाजाच्या विकासाच्या पातळीवर अवलंबून असते.

# १४४५.९७ कोटींच्या श्री अंबाबाई मंदिर विकास आराखड्याचा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शुभारंभ

## मंदिर जतन, वारसा संवर्धन, भाविकांसाठी आधुनिक सुविधा आणि पर्यटन विकासाला चालना देणाऱ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची मुहूर्तमेढ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज करवीर निवासिनी श्री अंबाबाई (महालक्ष्मी) मंदिर विकास आराखड्यांतर्गत १४४५.९७ कोटी रुपयांच्या मंदिर जतन, संवर्धन आणि परिसर विकासाच्या विविध कामांच्या कोनशीलेचे अनावरण करून शुभारंभ करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री कोल्हापूर जिल्हा प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, नगर विकास राज्यमंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याच्या सहपालकमंत्री माधुरी मिसाळ, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष तथा आमदार राजेश क्षीरसागर, महापौर रुपाराणी निकम, खासदार धनंजय महाडिक, आमदार अमल महाडिक, माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे, विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा, जिल्हाधिकारी तथा पश्रि्चम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ.विजय राठोड, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र



भारूड, पोलीस अधीक्षक निलोत्पल उपस्थित होते. गृहमंत्री अमित शहा यांनी सपत्नीक श्री अंबाबाईचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. त्यानंतर मंदिर परिसरातील रामाचा पार येथे श्रींच्या उत्सवमूर्तीचे पूजन करण्यात आले. श्रीफळ वाढवून मान्यवरांच्या उपस्थितीत नूतन प्रदक्षिणा मार्ग, परिवार देवता मंदिर संवर्धनासह मुख्य मंदिर जतन, संवर्धन आणि परिसर विकास कामांच्या कोनशीलेचे अनावरण करण्यात आले. यावेळी मंदिर परिसरात उभारण्यात आलेल्या मंदिर आराखडा प्रदर्शनाची माहिती जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी दिली.

करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी मंदिर हे भारतातील प्राचीन, जागृत आणि प्रमुख शक्तीपीठांपैकी एक मानले जाते. सुमारे हजार वर्षांहून अधिक इतिहास लाभलेल्या या मंदिराचा उल्लेख विविध पुराणे आणि ऐतिहासिक ग्रंथांमध्ये आढळतो. हेमाडपंथी स्थापत्यशैली, समृद्ध शिल्पकला आणि धार्मिक परंपरांचा अद्वितीय संगम असलेले हे मंदिर देश-विदेशातील लाखो भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. या पार्श्र्वभूमीवर राज्य शासनाने मंजूर केलेला महालक्ष्मी मंदिर विकास आराखडा हा कोल्हापूरच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक ओळखीला अधिक बळकटी देणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम ठरत आहे. मंदिर परिसरातील पायाभूत सुविधांचे उन्नतीकरण, वारसा संवर्धन, भाविकांसाठी आधुनिक सोयी-सुविधा आणि पर्यटन विकास या सर्व बाबींचा समन्वय साधत हा आराखडा राबविण्यात येत आहे. विकास आणि वारसा संवर्धन यांचा समतोल राखत राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पामुळे मंदिर परिसराचे वैभव अधिक वृद्धिंगत होणार असून भाविकांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी अंबाबाई देवस्थान परिसर विकास आराखड्याला ६ मे २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत एकूण १४४५.९७ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता देण्यात आली आहे. नियोजन विभागाच्या २८ ऑगस्ट २०२५ च्या शासन निर्णयानुसार या आराखड्याच्या पहिल्या टप्प्यात १४३.९० कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली असून त्यामध्ये पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार मूळ मंदिराचे जतन, संवर्धन आणि दुरुस्तीच्या कामांचा समावेश आहे. सध्या मूळ मंदिराच्या संवर्धनासाठी ३२.९६ कोटी रुपये तसेच मंदिरातील विद्युतीकरण, सीसीटीव्ही आणि लाईटिंगविषयक कामांसाठी २३.०५ कोटी रुपयांची कामे प्रगतीपथावर आहेत. मंदिराचे पुरातन वैभव आणि भव्यता जपण्यासाठी सभोवतालच्या ४१ लहान-मोठ्या मंदिरांचे संवर्धन, नगर प्रदक्षिणा मार्गाचे सुशोभीकरण आणि मंदिर परिसर विकासाची कामेही हाती घेण्यात येणार आहेत. यामुळे धार्मिक पर्यटनाला चालना मिळण्याबरोबरच स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळ मिळणार आहे.

या प्रकल्पासाठी एकूण २८,०५८ चौरस मीटर जमिनीचे मूल्यांकन करण्यात आले असून त्यापैकी १९,४८९ चौरस मीटर खाजगी क्षेत्राच्या भूसंपादनाची प्रक्रिया अपर मुख्य सचिव (नगर विकास) यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मार्गदर्शनाखाली वेगाने सुरू आहे. तीन टप्प्यांत राबविण्यात येणाऱ्या या बृहद विकास आराखड्याअंतर्गत दर्शन मंडप, अन्नछत्र, मंदिर व देवस्थान समिती कार्यालय, स्वतंत्र शौचालय ब्लॉक्स, चप्पल स्टँड, दुकाने, अँफिथिएटर, माहिती केंद्र, सुरक्षा चौकी, मल्टिपर्पज हॉल, पोलीस स्टेशन, प्रथमोपचार केंद्र, वेदपाठशाळा, भोजनगृह आणि मोठ्या प्रमाणावर वाहनतळ उभारण्यात येणार आहेत. केंद्र आणि राज्य शासन धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी कटिबद्ध असून हा विकास आराखडा भाविकांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देतानाच कोल्हापूरच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटन क्षेत्राच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरणार आहे. कार्यक्रमास राज्य शासनातील मंत्री, खासदार, आमदार, पश्रि्चम महाराष्ट्र देवस्थान समितीचे पदाधिकारी तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# भुयारी मेट्रोची दैनंदिन संख्या पहिल्यांदाच दोन लाखांच्या पार, बेस्ट संपामुळे प्रवासी संख्येत प्रचंड वाढ

**मुंबई/प्रतिनिधी :** आरे ते कफ परेड भुयारी मेट्रो ३ मार्गिका पूर्ण क्षमतेने धावू लागल्यानंतर या मार्गिकेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळू लागला आहे. मात्र असे असले तरी ही मार्गिका पूर्ण क्षमतेने धावू लागल्यापासून आतापर्यंत दैनंदिन प्रवासी संख्येने दोन लाखांचा टप्पा गाठला नव्हता. मात्र शुक्रवारी मेट्रो ३ मार्गिकेवरील दैनंदिन प्रवासी संख्या दोन लाखांचा टप्पा पार करून पुढे गेली. बेस्टच्या संपामुळे मुंबईच्या रस्त्यावर गाड्याच न उतरल्याने प्रवाशांनी पर्यायी वाहतूक व्यवस्था म्हणून मेट्रोला प्राधान्य दिले. परिणामी मेट्रो ३ मार्गिकेच्या प्रवासी संख्येत शुक्रवारी मोठी वाढ झाली. शुक्रवारी दिवसभरात या मार्गिकेवर २ लाख ३३ हजार ८५८ प्रवाशांनी प्रवास केला.

एमएमआरसीने दिलेल्या माहितीनुसार शुक्रवारी या मार्गिकेवरून २ लाख ३३ हजार ८५८ प्रवाशांनी प्रवास केला. शुक्रवारी बेस्ट संपामुळे मुंबईत केवळ ४८ गाड्या रस्त्यावर उतरल्या. बेस्ट गाड्या नसल्याने प्रवाशांचे हाल झाले. मात्र आता मुंबईकरांना सहा मेट्रो मार्गिकांचा पर्याय उपलब्ध असल्याने प्रवाशांनी मेट्रो प्रवासाला पसंती दिली. त्यामुळे शुक्रवारी सहाही मेट्रो मार्गिकांच्या प्रवासी संख्येत वाढ झाली. तर मेट्रो ३ मार्गिकेवरील दैनंदिन प्रवासी संख्येने विक्रमी टप्पा गाठला. शुक्रवारी सायंकाळी ७ वाजेपर्यंत या मार्गिकेवरून १ लाख ८१ हजार ७१६ प्रवाशांनी प्रवास केला.

दररोज या मार्गिकेवरून सायंकाळी सरासरी दीड लाख प्रवासी प्रवास करतात. शुक्रवारी रात्री ९ वाजता प्रवासी संख्येने दोन लाखांचा टप्पा पार करून प्रवासी संख्या २ लाख १७ हजार ९२७ वर गेली. तर सेवा बंद होईपर्यंत ही संख्या थेट २ लाख ३३ हजार ८५८ वर पोहोचली. ही आतापर्यंतची सर्वाधिक प्रवासी संख्या असून बेस्ट संपामुळे मेट्रो ३ मार्गिकेला फायदा झाल्याचे चित्र आहे. पुढे हीच प्रवासी संख्या कायम ठेवण्यात एमएमआरसीला यश येते का, हे पाहणे आता महत्त्वाचे असेल.

**३३.५ किमीची मुंबईतील पहिली भुयारी मेट्रो**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) १४ मेट्रो मार्गिकांच्या प्रकल्पातील आरे ते कफ परेड या भुयारी मेट्रो ३ मार्गिकेची बांधणी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी)कडून करण्यात आली आहे. तर या मार्गिकेचे संचालनही एमएमआरसीकडून करण्यात येते. ३३.५ किमीची भुयारी मार्गिका तीन टप्प्यांत सेवेत दाखल करण्यात आली आहे.

आरे ते बीकेसी टप्पा १ ऑक्टोबर २०२४ मध्ये, बीकेसी ते आचार्य अत्रे चौक मार्ग टप्पा २ जून २०२५ मध्ये आणि आचार्य अत्रे चौक ते कफ परेड टप्पा ३ ऑक्टोबर २०२५ मध्ये सेवेत दाखल झाला. पहिला टप्पा सेवेत दाखल झाला तेव्हा या मार्गिकेवरून अंदाजे ७५ हजार प्रवासी दिवसाला प्रवास करायचे. मात्र ऑक्टोबर २०२५ मध्ये तिसरा टप्पा सेवेत दाखल होऊन मेट्रो ३ पूर्ण क्षमतेने धावू लागल्यास प्रवासी संख्येत वाढ होऊ लागली. एक लाख २३ हजार ते दीड लाख अशी दैनंदिन प्रवासी संख्या वाढून ती आता पावणे दोन लाखांच्या पुढे गेली आहे. मेट्रो ३ मार्गिकेवरील दैनंदिन प्रवासी संख्या सध्या एक लाख ९० हजार अशी आहे.

# योगातून आरोग्य आरोग्यातून आनंद !

आपण आपल्या परंपरा जाणून आहोत पण जगात आपली ओळख आपल्या विशिष्ट आणि अतिशय वेगळ्या संस्कृतीमुळे आहे. याला आज आपण भारतीय संस्कृती म्हणतो त्याची सुरूवात सिंधू संस्कृती पासून झाली आहे आणि याला ५ हजार वर्षाहून अधिक असा मोठा वारसा आहे. भारतीतील आयुर्वेद तसेच योग ही जगाला ओळख आहे आणि आता जागतिक स्तरावर योगाचं महत्व मान्य झाल्यावर दरवर्षी २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा होत आहे.




योग दिवस हा २१ जून रोजी साजरा करण्याचं कारण म्हणजे हा जगाच्या उत्तर गोलार्धात असणारा सर्वात मोठा दिवस. याचं या भागातील देशांमध्ये वेगळं महत्व मानलं जातं. १४ जानेवारी रोजी दरवर्षी सूर्य मकरवृत्त या मानीव रेषेवर येतो आणि तिथून दिवसाचा कालावधी वाढण्यास सुरूवात होते. याचा शेवटचा आणि सर्वाधिक काळ दिवसाचा आणि सर्वात लहान काळ रात्रीचा असा असणारा दिवस म्हणून या दिवशी योग दिवस साजरा करावा असा प्रस्ताव प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर-२०१४ मध्ये संयुक्त राष्ट्र सभेत बोलताना आपल्या भाषणात मांडला होता. ज्याला जगभरातील १७७ देशांनी पाठिंबा दिला आणि प्रस्ताव मंजूर होऊन योग दिवस हा आंतरराष्ट्रीय योग दिवस झाला आणि तो जगभरात साजरा होतो.

योगाचा संबंध आपल्या आरोग्याशी असल्याने योगाचे महत्व जाणून जगभरात २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा झाला. याला जगभरात एकाचा वेळी लाखो जणांचा प्रतिसाद लाभला.

योग अर्थात योगासने यात सूर्यनमस्कार महत्वाचा मानला जातो मात्र केवळ सूर्यनमस्कार म्हणजे योग नाही. योग करताना विविध आसने केली जातात आणि प्रत्येक आसनाचा शरिराच्या विविध अंगांच्या व्यवस्थितपणा आणि तंदुरूस्तीत फायदा होतो. हे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेले असल्याने त्याचा फायदा आरोग्य राखण्यासाठी घेणाऱ्यांची संख्या देशातच नव्हे तर जगात वाढताना दिसत आहे.

काही गोष्टीत भारतीयांची मानसिकता अगदी वेगळी आहे. ''पिकतं तिथं विकत नाही'' अशा उक्तीप्रमाणे आपल्याच देशाची संस्कृती आपण दुर्लक्षित करतो आणि ''फॉरीन रिटर्न'' म्हणून तीच बाब समोर येते त्यावेळी आपण त्याचं कौतूक करतो असं दिसतं.

योगामध्ये ध्यान करण्याचं वेगळं महत्व आहे. ध्यान करण्यातून मानसिक आरोग्याला बळकटी मिळते हा भारतीय योग परंपरेचा एक भाग आहे. परंतु तो काळाच्या ओघात जवळपास विस्मरणात गेला. बौद्ध धर्म आपल्या देशात सुरू झाला यात ध्यान करण्याला विशेष महत्व आहे. ती साधना मानली जाते. बौद्ध धर्माचा प्रचार भारतापेक्षा पूर्व आशिया खंडात अधिक झाला. सोबतच चीनमध्ये देखील हा धर्म स्थिरावला. बौद्ध धर्म जपान देशात वाढला त्यावेळी ध्यान परंपरेला अधिक महत्व तेथे देण्यात आले आणि भारतातील ध्यान प्रथम चीनमध्ये चान आणि जपानी भाषेत झेन झाले.

ध्यान झेन शब्दासह भारतात दाखल झाल्यावर इथं सर्वांना पुन्हा नव्याने त्याचे महत्व कळलं आणि भारतात पुन्हा योग आणि ध्यान याकडे सर्वांनी गांभिर्यानं बघायला सुरूवात केली.

आपली सध्याची जीवनशैली तंत्रयुक्त आणि गतिमान झाली आहे. या धकाधकीमुळे ताण-तणाव वाढून आजाराचे प्रमाण वाढले आहे. यातून सुटका शक्य नाही, परंतु आचा दुष्परिणाम आरोग्यावर होणार नाही इतकी शारिरीक आणि मानसिक क्षमता बांधणी करण्याची ताकद योगात आहे. म्हणून योग महत्वाचा आणि ध्यान देखील.

ध्यानामुळे आपण अंतर्मनाचा वेध घेऊन एकाग्रता आणि मन:शांती वाढवू शकतो. आयुष्यात संकट आणि तणावाच्या काळात याचा अधिक लाभ होतो. ध्यान केल्याने मन:शांती तर मिळते सोबत मानसिक संतुलनात कमालीची वाढ होते. संकटकाळी निर्णय घेताना मनाचे संतुलन आणि स्थिरता यामुळे निर्णयक्षमता वाढते. याचा सर्वात मोठा फायदा मानसिक आरोग्याला होत असल्याने याला देखील आज अधिक महत्व आले आहे.

शारिरीक आरोग्याचा विचार करता आज वैद्यक शास्त्रात झालेली क्रांती आणि विकसित होणारे नवनवीन तंत्र यामुळे आजारांचे निदान झटपट होते. उपचार आणि औषधी असल्याने माणसाचं सरासरी आयुष्यमान वाढलं आहे. देशाला स्वातंत्र्य मिळालं त्यावेळी भारतातील सरासरी आयुर्मान केवळ ३२ वर्षे इतकच होतं, आता यात २० ते २५ वर्षे इतकी वाढ झाली आहे.

आयुर्मान वाढलं आणि ते आणखी वाढत जाणार हे मान्य करताना या वाढलेल्या आयुष्यात शरीर तंदुरूस्त राखण्याचं आव्हान आता ४०-५० वर्षाच्या पुढे सरकलेल्या पिढी समोर आहे. अवयव तंदुरूस्त राखणं हे औषधांनी होणारं काम नाही तर त्यासाठी व्यायाम महत्वाचा असतो आणि यातील सर्वोत्तम व्यायाम अर्थात योगासने होय म्हणून योग दिन महत्वाचा.

बैठे काम करणारे नव्हे तर अधिकाधिक यंग आणि वाहनाचा वापर करणाऱ्यांमध्ये मधुमेहासारख्या समस्या वाढत आहे. आहार आणि जीवनशैली सोबत योग हे शरीर तंदुरूस्त ठेवण्यासाठी आवश्यक आहे. शरिराच्या तंदुरूस्तीचा विचार करताना प्रत्येक अवयव महत्वाचा आहे. यासाठी विविध प्रकारची आसने आहेत याचे प्रकार आणि लाभ देखील जाणून घेतले पाहिजेत.

१) बसून करावयाची आसने

अ) पद्मासन - ध्यान आणि एकाग्रतेसाठी उत्तम.

ब) वज्रासन - जेवणानंतर पचनशक्ती सुधारण्याकरीता.

क) अर्धमत्सेन्द्रासन - पाठीचा कणा आणि पोटाच्या स्नायूंना सक्षम व निरोगी ठेवण्यासाठी.

२) पाठीवर झोपून करायची आसने

अ) सर्वांगासन - रक्ताभिसरण सुधार आणि थायरॉईड ग्रंथीसाठी लाभदायक

ब) हलासन- पाठीची लवचिकता वाढवणे आणि पोटावरील चरबी कमी करण्यासाठी

क) सेतूबंधासन - पाठ व कंबरदुखी कमी करण्यासाठी

३) पोटावर झोपून करायची आसने

अ) भुजंगासन- फुफ्फुसांची क्षमता वाढवण्यासह पाठदुखीसाठी

ब ) शलभासन- पाठीचा कणा मजबूत करण्यासाठी

क) धनुरासन- पचनक्रिया वृध्दी आणि एककूणच शाररिक सुडौलतेमध्ये वृध्दीसाठी

४) उभे राहून करावयाची आसने

अ) वृक्षासन- शरीराचा समतोलपणा राखणे व मन:शांती

ब) ताडासन- उंची वाढविणे व स्नायू बळकटीसाठी

क) त्रिकंणासन- कंबर, मांडी आणि खाद्यांची लवचिकता वाढवण्यासाठी

आपण साधारणपणे सोप्या आसनांनी सुरूवात करून आरोगयाचा मार्ग व्यवस्थित राखू शकतो. योग करा आणि निरोगी रहा. किंवा योगातून आरोग्य आणि आरोग्यातून आनंद जगणं कितीही धकाधकीचं असू दया एक गोष्ट महत्वाची ''जान है तो जहाँ है''

योग करा, योगाचा मार्ग आरोग्याचा मार्ग बाकी सांगणं काहीच नाही. योगदिन आहे एक दिवस साजरा न करता त्याला आयुष्याचा भाग बनवा आणि आनंदी रहा.

**-प्रशांत दैठणकर**
९८२३१९९४६

# बीड ते मुंबईच्या दिशेने निघालेला पायी लॉन्ग मार्च ११ व्या दिवशी पुण्यात दाखल

## ➤ २६ जून रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर निळ वादळ धडकनार..!
## ➤ होश मे आओ होश में आओ.. महाराष्ट्र सरकार होश मे आओ ..!

**नवी मुंबई / के. एच. हनवते :** फडणवीस सरकारला आमचा जाहीर इशारा...आरक्षणात उपवर्गीकरण करण्याचा निर्णय तातडीने रद्द करा..! सरकारने आमच्या संयमाचा अंत पाहू नये. हा फुले शाहू आंबेडकरी विचारांचा महाराष्ट्र आहे. कर्नाटक, तेलंगणा नाही. ही आंदोलनाची भूमी असून देशातील प्रत्येक आंदोलनाला दिशा देण्याचे काम महाराष्ट्राच्या आंबेडकरी चळवळीने केल्याचा ईतिहास आणि वर्तमान आहे. हे मुख्यमंत्री फडणवीसांनी लक्षात ठेवावे. डॉ.बाबासाहे आंबेडकर जयंतीपासून संपूर्ण महाराष्ट्र आंबेडकरी आंदोलनाने पेटलेला आहे गेल्या १० जून पासून बीड येथून पायी लॉंग मार्च ला सुरूवात झालेली असून मराठवाडा तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून हजारोच्या संख्येने निळे वादळ मुंबईच्या दिशेने येत आहेत, अनुसूचित जातीच्या एकतेला तोडण्याचे भाजपा सरकारचे मनुवादी षडयंत्र आम्ही हाणून पाडू..! असा निर्धार करत हजारोंच्या संख्येने बौद्ध-आंबेडकरी





कार्यकर्ते मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. चळवळीतील भावांनो...बघत बसू नका. (भाजप) संविधानाची मुलतत्त्वे संपवून टाकत आहे,निकलो बहार मकानो से जंग लढो बैईमानोसे आता रस्त्यावर संघर्ष करावाच लागेल. घरा बाहेर पडा आणि आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात सुरू झालेल्या या लाँग मार्च मध्ये सहभागी व्हा. तुम्ही पुढे या आणि नेतृत्व करा. हे आंदोलन पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी चळवळीतील कार्यकर्त्यांच्या खांद्यावर असेल. कोणत्याही पक्षाची, नेत्याची किंवा निमंत्रणाची वाट पाहू नका. हे समाजाचे आंदोलन आहे. त्यामुळे पक्षभेद, मतभेद बाजूला ठेवा. भाजपा विरोधात यल्गार पुकारण्यासाठी आपण एकत्रित येवून लढूयात.'' जय भीम जय संविधान जय भारत... आरक्षणाचे जनक छत्रपती: शाहूजी महाराज यांच्या जयंती दिनी २६ जून रोजी ''आरक्षण उपवर्गीकरण'' विरोधी निळे वादळ मुंबईत धडकणार..! या आंदोलनाला जाहीर पाठिंबा देण्यासाठी महत्वपूर्ण मिठींगचे आयोजन त्यात आपली भूमिका काय ? नोट : रविवार दिनांक - २१ जून २०२६ रोजी सायंकाळी : ७ते९ ठिकाण : कपिलवस्तू बुद्ध विहार, सेक्टर-१० नेरूळ नवी मुंबई येथून जनजागृती मोहीमेला सुरुवात या आंदोलनात शेकडोंच्या संख्येने सामील व्हा... कल्याणराव हनवते (संस्थापक अध्यक्ष : लॉर्ड बुद्धा कल्याण प्रतिष्ठान आणि समस्त बौद्धाचार्य - पत्रकार, बंधू आणि भगिनींनो...

## शॉर्टसर्किटमुळे पत्रकार प्रशांत मस्के यांचे घर व कपड्याचे दुकान आगीत भस्मसात; १ लाख ६१ हजार रुपयांचे नुकसान

### आगीत संसारोपयोगी साहित्यासह कपड्यांचे दुकान भस्मसात; आशा वर्कर प्रीती मस्के यांच्याकडील शासकीय रेकॉर्ड जळून खाक



**अंबाजोगाई/प्रतिनिधी :** आंबेजोगाई जवळील धावडी येथे शनिवार रोजी सकाळी सुमारे १०-०० वाजण्याच्या दरम्यान विद्युत शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत पत्रकार प्रशांत रघुनाथ मस्के यांचे घर व कपड्यांचे दुकान जळून खाक झाले.

या दुर्घटनेत घरातील फर्निचर, टीव्ही, कुलर, वॉशिंग मशीन तसेच दुकानातील साड्या व इतर कपड्यांसह मोठ्या प्रमाणात साहित्य जळून नष्ट झाले. त्याचबरोबर पत्रकार प्रशांत मस्के यांच्या पत्नी प्रीती प्रशांत मस्के या आशा वर्कर म्हणून भावठाणा पीएसी अंतर्गत धावडी येथे आशा वर्कर म्हणून कार्यरत आहेत परंतु सदरील घटनेत आशा वर्कर प्रीती मस्के यांच्याकडे उपलब्ध असलेले शासकीय रेकॉर्ड देखील या घटनेत जळून खाक झाले आहे. अशी माहिती त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, विजेच्या शॉर्टसर्किटमुळे ही आग लागली असून या दुर्घटनेत अंदाजे १ लाख ६१ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. आगीमुळे घरगुती साहित्य आणि व्यावसायिक माल दोन्हीचे मोठे नुकसान झाल्याने मस्के कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस पाटील, सरपंच, तलाठी व मंडळ अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच नुकसानीचा पंचनामा करून संबंधित अहवाल प्रशासनाकडे सादर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## जपानी कंपन्यांसाठी सुपे परिसरात 'क्लस्टर'

**पुणे/प्रतिनिधी :** राज्य सरकार पुणे जिल्ह्यात सुपे येथे जपानी कंपन्यांसाठी 'क्लस्टर' उभे करीत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मुख्य सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी शुक्रवारी दिली. 'राज्याच्या वेगवेगळ्या भागांत क्लस्टर उभे राहत असून, त्याचा उद्योगवाढीसाठी फायदा होणार आहे. त्यामुळे राज्याच्या अर्थचक्रालाही गती मिळेल,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

लघु उद्योग भारतीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात धवसे बोलत होते. त्यांनी 'महाराष्ट्राच्या एक ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेच्या ध्येयात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची भूमिका' या विषयावर भाष्य केले. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अमित घैसास यांनी धवसे यांच्याशी संवाद साधला.

धवसे म्हणाले, 'सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे राज्याच्या आर्थिक विकासात सक्रिय भूमिका बजावतात. आता राज्याच्या आर्थिक प्रगतीचा वेग वाढत आहे. त्यासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाला पाठबळ देण्यात येत असून, महाराष्ट्राला अग्रेसर करण्यात त्याचा फायदा होणार आहे. या उद्योगांनीही पुरवठा साखळी समजावून घेऊन काम करण्याची गरज आहे.' 'यापूर्वी राज्यातील उद्योग-व्यवसाय हे मुंबई, पुणे, नवी मुंबई, ठाणे या भागांपुरते मर्यादित होते. त्यामुळे काही प्रमाणात प्रादेशिक असमतोल निर्माण झाला होता. आता हा असमतोल दूर होत असून, छत्रपती संभाजीनगर, जालना, नागपूर या भागांचाही मोठ्या प्रमाणात औद्योगिक विकास होत आहे. आतापर्यंत गडचिरोलीचा परिसर हा नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जायचा. त्याचेही रूप बदलत असून, तिथेही 'स्टिल इंडस्ट्री'चा विकास होत आहे.'

दरम्यान, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे या उद्योगासाठी राज्य सरकारने स्वतंत्र मंत्रालय करण्याची मागणी लघु उद्योग भारतीच्या वतीने करण्यातआली. नचिकेत फडके यांनी सूत्रसंचालन केले. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना कर्ज देताना त्यांना आकारण्यात येणारे व्याजदर कमी करण्याची गरज आहे. या उद्योगांना पुढे नेण्यासाठी सरकारकडून प्रोत्साहन देण्यात येईल. त्यांना आवश्यक असणारी सर्व मदत करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. - कौस्तुभ धवसे, मुख्यमंर्त्याचे मुख्य सल्लागार (गुंतवणूक व धोरण)

## शिवसेनेत जाण्याबाबत अद्याप निर्णय नाही!

**मुंबई/प्रतिनिधी :** उबाठा गटाच्या ६ फुटीर खासदारांमध्ये नाव असलेले धाराशीवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी पवनराजे निंबाळकर हत्याप्रकरणाच्या निकालानंतर धक्कादायक विधान केले आहे. ''शिवसेनेत जाण्याबाबत मी अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. मी माझ्या मतदारसंघात जाऊन कार्यकर्त्यांशी चर्चा करेन आणि मगच पुढील निर्णय घेईन. या खटल्याचा निकाल आणि माझ्या राजकीय निर्णयाचा कोणताही संबंध नाही; सध्या कलियुग सुरू आहे,'' असे ओमराजे यांनी सांगितले. त्यामुळे खासदारांच्या बंडाबाबत सस्पेन्स वाढला आहे. पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणात शनिवारी विशेष न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केल्याने खासदार ओमराजे निंबाळकरांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, ''मला वाटते न्यायव्यवस्थेचे यापेक्षा मोठे दुर्दैव असू शकत नाही. या खटल्याच्या निकालासाठी २० वर्षांचा मोठा कालावधी घेतला गेला, त्यानंतर असा निर्णय येत असेल तर हे दुर्दैवी आहे. कोर्टाने राजकीय वैमनस्य होते हे मान्य केले आहे, पण तरीही सगळ्या आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. हत्या झाली ही वस्तुस्थिती आहे, मग ही हत्या नक्की कोणी केली?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## बाप्पाचं दर्शन घेतलं अन् मजा करायला बीचवर गेले, गणपतीपुळ्याच्या समुद्रात ५ पर्यटक बुडाले

**रत्नागिरी :** विकेण्डमुळे समुद्रकिनाऱ्यावर अजूनही एन्जॉय करायला लोक जात आहेत. कोकणातलं गणपतीपुळे हे पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. गणपतीपुळ्यात मंदिरात दर्शन घेऊन मग बीचवर मजा करायला गेलेल्यांपैकी ५ जण समुद्रात बुडाल्याची माहिती मिळाली आहे. पर्यटनासाठी आलेले पाच जण एकाच वेळी बुडाले. दरम्यान पर्यटक बुडाल्याची माहिती मिळताच तातडीनं बचावकार्य सुरू झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार गणपतीपुळ्याच्या समुद्रात पाण्याचा अंदाज न आल्याने हे पर्यटक बुडाल्याची माहिती मिळाली आहे. सकाळी १० वाजता ही घटना घडली. सर्च ऑपरेशन सुरू आहे. गणपतीपुळ्याचा समुद्र आधीच धोकादायक मानला जातो. त्यात आनंद आणि मजेसाठी गेलेले पर्यटक बुडाल्याने खळबळ उडाली आहे. पाचही जण बेपत्ता असून त्यांचा शोध घेण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

## पद्मसिंह पाटलांची निर्दोष मुक्तता, सीबीआयने 30 मिनिटात घेतला मोठा निर्णय!

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या २० वर्षापासून प्रलंबित असलेल्या पवनराजे निंबाळकर हत्याकांड प्रकरणाचा निकाल समोर आला आहे. कोर्टाने पद्मसिंग पाटील यांच्यासह सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. अशातच आता पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणात विशेष न्यायालयाने दिलेल्या निर्दोष मुक्ततेच्या निर्णयाविरोधात केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआय उच्च न्यायालयात अपील दाखल करणार असल्याची माहिती सूत्रांकडून समोर येत आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला होता. निर्णयानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत चर्चा केल्याची माहिती आहे. या चर्चेनंतर सीबीआयला उच्च न्यायालयात निर्णयाला आव्हान देण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आल्याचा दावा सूत्रांकडून केला जात आहे. आता या प्रकरणात पुढील कायदेशीर घडामोडींवर सर्वाचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणात आरोपींविरुद्ध भक्कम पुरावे सादर केले गेल्यामुळे, सीबीआय कनिष्ठ न्यायालयाच्या या निकालाला उच्च न्यायालयात आव्हान देणार आहे. विशेष न्यायालयाने सुनावणीवेळी सीबीआयच्या तपासावर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. तसेच सीबीआयने पुरावे देखील व्यवस्थित सादर केले नाहीत, असे निरिक्षण देखील कोर्टाने नोंदवले होते. अशातच आता सीबीआयने उच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतलाय.

# आषाढी यात्रेसाठी एसटीच्या पाच हजार ५०० विशेष बसेस- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची एसटी यंदाही सज्ज झाली आहे. आषाढी एकादशी यात्रेनिमित्त राज्यभरातून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविकांच्या सुरक्षित, सुलभ आणि सुखकर प्रवासासाठी एसटी महामंडळाने ५ हजार ५०० विशेष बसेस सोडण्याचे नियोजन केले आहे. राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

आषाढी यात्रेदरम्यान लाखो वारकरी पालख्यांसह पायी, रेल्वेने, खासगी वाहनांनी आणि एसटीने पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या



भाविकांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी महामंडळाने व्यापक नियोजन केले आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना 'महिला सन्मान योजना' अंतर्गत तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे.

मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने ५,२०० विशेष बसेस चालवून तब्बल २१ लाख ९५ हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती. यंदा त्याहून अधिक सक्षम नियोजन करण्यात आले आहे.

वारीदरम्यान रात्रंदिवस सेवा बजावणारे चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चाने चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था केली आहे. सुमारे १३ हजार कर्मचारी या सुविधेचा लाभ घेणार आहे.

एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे ३६ हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक स्थानिक पोलीस प्रशासनासोबत कार्यरत राहणार आहेत. त्यामुळे वाहतूक नियोजन अधिक प्रभावी होऊन भाविकांचा प्रवास सुलभ होणार आहे.

भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पंढरपूर येथे चंद्रभागा, भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

राज्यभरातील भाविकांनी एसटीच्या सुरक्षित, विश्र्वासार्ह आणि लोकाभिमुख सेवांचा लाभ घेत विठुरायाच्या दर्शनाचा आनंद घ्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा या भावनेतून एसटी यंत्रणा संपूर्ण यात्राकाळात अहोरात्र सेवेसाठी तत्पर राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# फडणवीस सरकारचा मोठा निर्णय : सरकारी जागेची परस्पर मालकी नोंदवणाऱ्यांना दणका

## भाडेपट्टा नोंदीवर आता'महाराष्ट्र शासन' कब्जेदार ! - भाडेपट्टाधारकांची नावे इतर हक्कात नोंदविणार
## तीन महिन्यात नोंदी अद्ययावत करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश- महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात मोठ्या संख्येने असलेल्या भाडेतत्वावरील शासकीय जमिनीवर स्वतःचीच मालकी सांगणाऱ्या संस्था, कंपन्या, प्राधिकरणे तसेच व्यक्तींना देवेंद्र फडणवीस सरकारने मोठा दणका दिला आहे.आता अशा सर्व भाडेपट्ट्यावरील जमिनींच्या अधिकार अभिलेखात कब्जेदार म्हणून केवळ महाराष्ट्र शासन हीच नोंद करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे.

महसूल विभागाने याबाबत परिपत्रक जारी केले असून,संपूर्ण राज्यात पुढील तीन महिने विशेष मोहीम अशा नोंदी तपासून त्या कब्जेदार म्हणून महाराष्ट्र शासनाच्या नावावर करण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

शासनाकडून अनेक व्यक्ती किंवा संस्थांना ३०, ९९ किंवा ९९९ वर्षांच्या दीर्घ मुदतीसाठी जमिनी भाडेकरारावर



दिल्या जातात. मात्र, या जमिनींच्या कब्जेदार रकान्यात (सदरी ) रमहाराष्ट्र शासनाच्या नावाऐवजी शासनाच्या परवानगीशिवाय भाडेपट्टा धारकांचीच नावे लागल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास आला आहे.तत्कालीन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रीतसर नोंदी न घेतल्याने,अनेक भाडेपट्टाधारक या सरकारी जमिनी स्वतःच्याच मालकीच्या (खासगी) असल्याचे गृहीत धरत आहेत,ज्यातून अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्भवत आहेत. हा खासगी मालकीचा खेळ मोडून काढण्यासाठी आता सरकारने थेट कारवाईचा बडगा उगारला असून, भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनींच्या अधिकार अभिलेखातील कब्जेदार सदरी आता केवळ महाराष्ट्र शासनाच्या नावाची नोंद असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**भाडेपट्टाधारक आता इतर अधिकारात**

भाडेपट्टाधारकाचे नाव, भाडेपट्ट्याचा कालावधी आणि ज्या अटींवर जमीन दिली आहे,त्याची नोंद आता इतर अधिकार या सदरी घेण्यात येईल.

**३ महिन्यांचा अल्टीमेटम**

सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ विशेष मोहीम हाती घेऊन,रितसर कार्यपद्धती अवलंबून अवघ्या तीन महिन्यांत या सर्व अद्ययावत नोंदी घ्याव्यात.महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ अंमलात येण्यापूर्वी कोणत्याही कायद्याखाली कायमस्वरुपी अथवा नूतनीकरणाचा पर्याय देऊन ५० वर्षांच्या मुदतीसाठी दिलेल्या भाडेपट्ट्यांना संहितेच्या कलम २९ (३) क नुसार भोगवटादार वर्ग-२ च्या तरतुदी लागू होतील.जिल्हाधिकाऱ्यांनी अशा भाडेपट्टा सदरी ३० दिवसांच्या आत भोगवटादार वर्ग-२ अशी नोंद घेऊन शासनाला अहवाल सादर करण्याचे स्पष्ट आदेश महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले आहेत.

''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महसूल प्रशासन अधिक पारदर्शक,अचूक आणि नागरिकाभिमुख करण्यावर भर दिला जात आहे. शासकीय भाडेपट्टा जमिनींच्या नोंदींबाबत राज्यभर एकसमान आणि स्पष्ट प्रणाली निर्माण करण्यासाठी हे निर्देश जारी करण्यात आले आहेत.यामुळे शासनाच्या मालकीच्या जमिनींबाबतची माहिती अधिक अचूक होईल,अनावश्यक वाद कमी होतील आणि महसूल व्यवस्थापन अधिक सक्षम होईल.

**-चंद्रशेखर बावनकुळे,**
**महसूल मंत्री.**

**मुंबईतही आवळल्या नाड्या**

मुंबई शहरासाठी लागू असलेल्या नियमांनुसार,अस्तित्वात असलेल्या सर्व पट्ट्यांच्या हस्तांतरणाच्या निर्बंधांबाबतच्या नोंदीदेखील मुंबई शहरातील शासकीय जमिनीच्या अधिकार अभिलेखात तात्काळ घेण्याचे आदेश शासनाने दिले आहेत.त्यामुळे मोक्याच्या ठिकाणी असलेल्या सरकारी जमिनींवर मालकी हक्क सांगणाऱ्यांना आता चांगलाच चाप बसणार आहे.

## न्यू यॉर्कपेक्षा मुंबईची मेट्रो स्वच्छ, अमेरिकेतील महिलेने सांगितला भन्नाट अनुभव; सुरक्षा अन् तिकिट दराबाबत केलेला व्हिडीओ चर्चेत

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील मेट्र प्रवास सुरक्षित, आरामदायी आणि परवडणारा आहे, असं मुंबईबाहेरून येणारा प्रत्येकजण म्हणतो. मुंबईसारखी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था इतर कोणत्याही शहरात सहज सापडत नाही. मुंबईतील बेस्ट उपक्रम असो, लोकल सेवा असो वा मेट्रो सेवा असो; या सर्व वाहतूक व्यवस्थेमुळे मुंबईतील प्रवास किफायतशीर आणि सुलभ होतो. मुंबईतील याच सार्वजनिक व्यवस्थेचं आता चक्क अमेरिकेतली महिलेने कौतुक केलंय. एवढंच नव्हे तर तिने अमेरिकेने भारताकडून सार्वजनिक व्यवस्थेचे धडे घ्यावेत असंही म्हटलंय.

एका अमेरिकन महिलेने मुंबई मेट्रोमधून पहिल्यांदा प्रवास केल्याचा तिचा अनुभव सोशल मीडियावर शेअर केला आहे. न्यूयॉर्कमधील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेशी तुलना करताना तिने मुंबई मेट्रोची स्वच्छता, सुरक्षा आणि किफायतशीरपणाचे कौतुक केले असून, तिच्या या व्हिडिओने इंटरनेटवर अनेकांचे लक्ष वेधून घेतले आहे. हा व्हिडिओ 'ीळिलूसीळ' या इंस्टाग्राम अकाउंटवर पोस्ट करण्यात आला आहे, जे लिझ आणि शिव चालवतात.या क्लिपमध्ये, लिझने तिच्या मुंबईतील पहिल्या मेट्रो प्रवासाचे चित्रीकरण केले असून प्रवासाच्या विविध टप्प्यांवर तिची मते मांडली आहेत. व्हिडिओच्या सुरुवातीला लिझने सांगितलं की ती मुंबईत आहे आणि पहिल्यांदाच मेट्रोने प्रवास करत आहे. तिकीट खरेदी करताना, एका तिकिटाची किंमत फक्त २० रुपये असल्याचं सांगत ही सेवा खूपच परवडणारी असल्याचा उल्लेख तिने केला.

स्टेशनवरून जाताना तिने परिसर खूप स्वच्छ असल्याचंही सांगितलं. तसंच, प्लॅटफॉर्मवरील सरकते दरवाजे तिला खूप आवडले, कारण यामुळे तिथली सुरक्षा अधिक मजबूत वाटते असं ती म्हणाली.

न्यूयॉर्क मेट्रोशी तुलना

ट्रेनमध्ये चढल्यानंतर तिची पहिली प्रतिक्रिया अशी होती की, ही ट्रेन न्यूयॉर्कमधील मेट्रोपेक्षा खूपच जास्त स्वच्छ आहे. मुंबईत प्रचंड उष्णता असल्याने मेट्रोमधील थंडगार वातानुकूलित वातावरण खूपच छान वाटल्याचं तिने आवर्जून सांगितलं.

# विनोदभाऊ खटके यांचा वाढदिवस जनसेवा दिवस म्हणून अनेक सामाजिक उपक्रम राबवून उत्साहात साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांचा वाढदिवस व्ही एस पँथर्स युवा संघटनेने जनसेवा दिवस म्हणून साजरा केला. आज वाढदिवसानिमित्त विनोद भाऊ खटके यांच्या वतीने शहरातील मिलिंद नगर येथील विहाराला बुद्ध मूर्ती सप्रेम भेट देण्यात आली आणि त्याची प्रतिष्ठापना आदरणीय भंते पैयानंद, विरोधी पक्षनेते देविदास काळे विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातील शस्त्रक्रिया प्रमुख डॉ मेघराज चावडा आणि स्वतः विनोद भाऊ ख टके यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

यानंतर विहाराच्या वतीने विनोद भाऊ खटके यांचा वाढदिवस साजरा करून शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी संपादक अशोक हनवते माजी नगरसेवक रघुनाथ बनसोडे नगरसेवक थोरात यांच्या सह परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यानंतर लेबर कॉलनी येथील माता रमाई रुग्णालय येथे विनोद भाऊ खटके यांच्या वाढदिवस निमित्त रुग्णालयाच्या वतीने डॉ भालेराव यांनी सत्कार करून दीर्घ आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या यानंतर येथे प्रसूती झालेल्या माताना साडी आणि नवजात बालकांना ड्रेस वाटप दीक्षा राणी खटके, शांताबाई सरवदे अजय सूर्यवंशी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

तसेच यावेळी व्ही एस पँथर्स शहर ऑटो युनियनच्या वतीने फळ वाटप करण्यात आले बाळ वाटप समारोहाचे नियोजन ऑटो युनियन शहराध्यक्ष जगदीश सर वदे ,गणेश कसबे व इतर पदाधिकाऱ्यांनी केले.

यानंतर लातूर शहर वाहतूक आघाडीच्या वतीने संघटनेच्या मध्यवर्ती कार्यालयासमोर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या या रक्तदान शिबिरामध्ये ७२ रक्तदात्यांनी रक्तदान करून विनोद भाऊ खटके यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. रक्तदान शिबिराच्या आयोजनासाठी प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन भाऊ मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष शाहरुख मणियार आसिफ शेख ,राजू खान तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

यानंतर सुभेदार रामजी नगर येथील कृषी ग्राम येथे विद्यार्थी आघाडीच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी स्पोर्ट ड्रेस आणि शैक्षणिक साहित्याचे मोफत वितरण विनोद भाऊ खटके यांच्या हस्ते करण्यात आले या उपक्रमाचे नियोजन विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी केले होते. यानंतर सिरसी रोडवरील मतिमंद विद्यालयात युवा उद्योजक प्रणय मालू यांच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी मिष्टान्न भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

यावेळी शाळेच्या वतीने विनोद भाऊ खटके यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला आणि शाळेतील मुख्याध्यापकाने विद्यालयातील विविध उपक्रमाची माहिती दिली. निलंगा तालुक् बाल सदन येथे फ ळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला , म्हाडा कॉलनीतील सावित्रीबाई फुले विद्यालयात जिल्हा कार्याध्यक्ष अकबर शेख यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

वीर भगतसिंग चौक येथील शाखेच्या वतीने मार्गदर्शक संतोष मांदळे यांच्या नेतृत्वाखाली परिसरातील कामगार महिलांना परिसरातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण विनोद भाऊ खटके यांच्या हस्ते करण्यात आले आणि यानंतर विनोद भाऊ खटके यांचा वाढदिवस जल्लोषात साजरा करण्यात आला. एक नंबर चौकामध्ये विद्यार्थी आघाडीच्या वतीने अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मध्यवर्ती कार्यालयात जिल्हाभरातील सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी भेट देऊन विनोद भाऊ ख टके यांना शुभेच्छा दिल्या.

या जनसेवा दिवस उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन मस्के संपर्कप्रमुख आनंद जाधव मार्गदर्शक संतोष मांदळे रवी कुरील ग्रुप अध्यक्ष अमोल कांबळे जिल्हाध्यक्ष शरद किनीकर जिल्हा कार्याध्यक्ष अकबर शेख विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ शहराध्यक्ष असद भाई शेख ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड वाहतूक आघाडी शहराध्यक्ष शाहरुख मणियार ऑटो युनियन शहराध्यक्ष जगदीश सर्वदे सुरज सूर्यवंशी गोविंद कांबळे निलंगा तालुकाध्यक्ष धनराज सुरवसे औसा तालुका अध्यक्ष सुनील सातपुते कृष्णा कांबळे जिल्हा उपाध्यक्ष दाजी कांबळे मनोज कांबळे श्रीकांत आगमने सह आदींनी परिश्रम घेतले.

# लातूर काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाची आज महत्त्वपूर्ण बैठक

## नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष डॉ. अनिरुद्ध वनकर, शहर जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर आणि महापौर सौ. जयश्री सोनकांबळे यांचा होणार भव्य सत्कार

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग आणि लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग यांची एक संयुक्त व महत्त्वपूर्ण बैठक उद्या, रविवार दिनांक २१ जून रोजी दुपारी ४:०० वाजता काँग्रेस भवन, लातूर येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत पक्षाच्या विविध संघटनात्मक विषयांवर चर्चा होणार असून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा भव्य सत्कार सोहळाही संपन्न होणार आहे.

या बैठकीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष मा. डॉ. अनिरुद्ध वनकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. डॉ. वनकर यांची नुकतीच प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल लातूर जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर यांची नूतन निवड झाली आहे. ते स्वतः अनुसूचित जाती प्रवर्गातील असून, त्यांच्या या निवडीच्या माध्यमातून समाजाला पक्षात एक अत्यंत महत्त्वाचे व सन्मानाचे स्थान मिळाले आहे. याबद्दल मा. डॉ. अनिरुद्ध वनकर यांच्या हस्ते प्रा. डॉ. जवळगेकर यांचाही विशेष सत्कार याप्रसंगी करण्यात येणार आहे.



याचबरोबर, लातूरच्या नवनिर्वाचित महापौर सौ. जयश्री सोनकांबळे तसेच अनुसूचित जाती प्रवर्गातून निवडून आलेले काँग्रेसचे सर्व महानगरपालिका सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सहकार संस्थेतील संचालक आणि नगरपंचायत सदस्यांचाही याप्रसंगी सन्मान केला जाणार आहे.

प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सूचनेनुसार, या बैठकीदरम्यान पक्ष संघटन मजबुतीकरण, सदस्य नोंदणी अभियान, आगामी कार्यक्रमांचे नियोजन, स्थानिक प्रश्न तसेच विभागीय कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे. या सत्कार समारंभ व बैठकीच्या अध्यक्षस्थानी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. अभय साळुंके हे उपस्थित राहणार आहेत.

तरी या महत्त्वपूर्ण बैठकीला लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाचे सर्व तालुकाध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य, तसेच लातूर शहर काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाचे सर्व प्रभाग अध्यक्ष व कार्यकारिणी सदस्यांनी वेळेवर व मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी अनु. जाती विभाग अध्यक्ष ॲड. बाबासाहेब गायकवाड आणि लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनु. जाती विभाग अध्यक्ष प्रा. प्रवीण कांबळे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## कल्याण ज्वेलर्सच्या नावाने ८७ लाखांची फसवणूक; संशयित ताब्यात

**कल्याण/प्रतिनिधी :** कमी किमतीत सोने आणि महागडे मोबाईल देण्याचे आमिष दाखवून संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या नगरसुल येथील सुप्रसाद प्रमोद दीक्षित या संशयित महाठगाने येवला तालुक्यातील एका बड्या उद्योजक व कंत्राटदाराला तब्बल ८७ लाख रुपयांना गंडा घातल्याचे अधिकृत एफआयआर मधून समोर आले आहे.

या प्रकरणी येवला तालुका पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत संशयित आरोपी सुप्रसाद दीक्षित याला पुणे येथून अटक केली आहे. न्यायालयाने त्याला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून, या प्रकरणातील फसवणुकीची व्याप्ती ३० ते ३५ कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या प्रकरणात आणखी अनेक पीडित समोर येण्याची शक्यता असून, फसवणुकीचा आकडा आणखी वाढण्याची चर्चा आहे.

एफआयआरमधील माहितीनुसार, बाळापूर (ता. येवला) येथील कंत्राटदार व उद्योजक अंकुश प्रकाश शिरसाठ (वय ४५) यांनी वैयक्तिक सोन्याची खरेदी करण्यासाठी संशयित आरोपी सुप्रसाद दीक्षित याच्याशी संपर्क साधला होता. दीक्षितने शिरसाठ यांचा विश्वास संपादन करत, ''कल्याण ज्वेलर्समध्ये सध्या सोन्याच्या खरेदीवर मोठी ऑफर सुरू आहे,'' असे सांगितले. त्यानंतर त्याने सांगितलेल्या बँक खात्यांवर शिरसाठ यांनी व्यावसायिक कामासाठी घेतलेल्या कर्ज रकमेतून तसेच स्वत:च्या आणि नातेवाईकांच्या क्रेडिट कार्डद्वारे एकूण ८७ लाख रुपये वर्ग केले.

## घाणेरडे व्हिडीओ पाहून महिला अनुयायींसोबत करायचा नको तो प्रकार; पुण्यात धक्कादायक प्रकार!

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील खराडी परिसरातून एक धक्कादायक प्रकार समोर आलाय. भोंदू बाबांच्या आहारी गेल्याचा त्रास अनेक अनुयायींना सहन करावा लागलाय. स्वत:ला आध्यात्मिक गुरु म्हणवून घेणाऱ्या राधामोहन मिश्रा उर्फ भोंदूबाबाविरोधात गंभीर आरोप समोर आले आहेत. एका महिलेला तिच्यावर वाईट शक्तींचा प्रभाव असल्याचे सांगून अनुयायांसमोरच मारहाण केल्याचा आरोप भोंदू बाबावर करण्यात आलाय. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडालीय. काय घडलंय नेमकं? सविस्तर जाणून घेऊया.

पीडित महिलेने पोलिसांत भोंदू बाबा विरोधात तक्रार दाखल केलीय. पीडित महिलेला उपचार आणि धार्मिक विधीच्या बहाण्याने आश्रमात बोलावण्यात आले. त्यानंतर अनेक महिला अनुयायांसमोर तिचा मानसिक व शारीरिक छळ करण्यात आला. महिलेला अपमानास्पद वागणूक देत मारहाण केल्याचेही पीडितेने तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणात अंधश्रद्धा आणि धार्मिक श्रद्धेचा गैरफायदा घेत लोकांची फसवणूक करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. काही अनुयायांकडून आर्थिक लाभ मिळवल्याचाही तपास सुरू असून, पोलिसांकडून विविध बाबींची चौकशी केली जात आहे.पीडित महिलेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी भोंदूबाबाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेशी संबंधित व्हिडीओ, साक्षीदारांचे जबाब आणि इतर पुरावे तपासले जात आहेत. अधिकाऱ्यांनी दोषींवर कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत.

या घटनेमुळे समाजात अंधश्रद्धेविरोधात जागरूकता वाढवण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. कोणत्याही व्यक्तीच्या दाव्यांवर आंधळा विश्वास न ठेवता वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांनी म्हटले आहे.

# आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त उमंग स्पेशल स्कूलमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

## उषाताई तळेगावकर यांच्या हस्ते दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप; उमंग व जिल्हा परिषद शाळांना सर्वतोपरी मदतीची ग्वाही

**लातूर/प्रतिनिधी :** समाजातील विशेष मुलांच्या शिक्षणाला नवी दिशा देणारा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम माजी पालकमंत्री तथा आमदार मा. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त उमंग ऑटिझम सेंटर व उमंग स्पेशल स्कूल, लातूर येथे उत्साहात पार पडला. यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

जिल्हा परिषद अध्यक्षा मा. सौ. उषाताई संभाजीराव पाटील तळेगावकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या, शालेय साहित्य व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. साहित्य स्वीकारताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, पालकांच्या डोळ्यांतील समाधान आणि उपस्थितांच्या मनातील भावनिक स्पंदने हा कार्यक्रमाचा अविस्मरणीय क्षण ठरला. यावेळी मार्गदर्शन करताना उषाताई तळेगावकर यांनी जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढविणे, पटसंख्या वृद्धिंगत करणे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येतील, असे स्पष्ट केले. तसेच उमंग स्पेशल स्कूल, उमंग ऑटिझम सेंटर आणि जिल्हा परिषद शाळांच्या विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य व निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही त्यांनी दिली.




''मा. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या विकासदृष्टीतून प्रेरणा घेत शिक्षण क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील राहू. विशेष मुलांचे शिक्षण, पुनर्वसन आणि सक्षमीकरण ही समाजाची सामूहिक जबाबदारी असून त्यासाठी जिल्हा परिषद सदैव कटिबद्ध राहील,'' असे प्रतिपादन त्यांनी केले.

जिल्हा परिषद लातूरचे प्रभारी प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रमोद पवार यांनी विशेष विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासाबरोबरच जिल्हा परिषद शासकीय वसाहत प्राथमिक शाळेच्या प्रलंबित समस्या आणि आवश्यक सुविधांबाबत सकारात्मक भूमिका घेऊन त्या मार्गी लावण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभाग कटिबद्ध असल्याचे सांगितले. विशेष मुलांसाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन स्तरावर विशेष प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमास भारतीय जनता पक्षाचे संभाजी पाटील तळेगावकर, उमंग सेंटरचे प्रकल्प संचालक किरण उटगे, कन्या प्रशालेचे मुख्याध्यापक भगवान माळी, जिल्हा परिषद शासकीय वसाहत प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुनील हाके, प्राथमिक शिक्षक शरद पाटील, व्यवस्थापक ॲड. श्रीहरी गोरे, एच.आर. व प्रशासन व्यवस्थापक रामेश्वर जाधव, डॉ. अर्जुन राठोड, डॉ. प्रविण राठोड, डॉ. वैष्णवी शिंगण, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक, उमंगचे कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रेरणादायी उपक्रमाच्या यशामागे प्राथमिक शिक्षक शरद पाटील यांचे विशेष योगदान राहिले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन, व्यवस्थापन व समन्वय त्यांनी अत्यंत जबाबदारीने पार पाडल्याने कार्यक्रमाला विशेष उंची लाभली.

विशेष मुलांच्या शिक्षणाप्रती त्यांची असलेली तळमळ आणि कार्यनिष्ठा या उपक्रमातून प्रकर्षाने दिसून आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक सुनील हाके आणि ॲड. श्रीहरी गोरे यांनी अत्यंत प्रभावी, अभ्यासपूर्ण व ओघवत्या शैलीत केले. विशेष मुलांच्या शिक्षणाचे महत्त्व, सामाजिक समावेशनाची गरज आणि शिक्षणाच्या माध्यमातून घडणारे सक्षमीकरण यांची प्रभावी मांडणी त्यांनी केली.

विशेष मुलांच्या शिक्षणासाठी समाजातील विविध घटकांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याची गरज अधोरेखित करणारा हा कार्यक्रम ठरला. उमंग स्पेशल स्कूल आणि जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी हा उपक्रम मैलाचा दगड ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. विशेष मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी व्यक्त झालेली बांधिलकी, हीच संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त दिलेली सर्वात मौल्यवान भेट ठरली.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.